◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

NEED 24 NEWS
हर ख़बर, हर शहर

नीड 24 न्यूज़

हर खबर, हर शहर

◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

DIGITAL E-PAPER

PRGI APPLICATION UNDER PROCESS
Application No. T/GJ/2026/0619/2304/1577

GST
GSTIN 24CINPG0564Q1ZT

UDYAM REGISTERED
UDYAM-GJ-14-0003714

◆ DIGITAL NEWS NETWORK ◆
भारताचे विश्वासार्ह बहुभाषिक डिजिटल न्यूज नेटवर्क
11+ Languages | 24×7 Live | e-Paper Daily

आमचे App डाउनलोड करा
Download on the App Store
GET IT ON Google Play

www.need24.digital
info@need24.in
+91 98700 06472
FOLLOW US:

तेज़ | सटीक | निष्पक्ष | जनहित में | सच की आवाज़ | जन-जन की आवाज़ | निडर पत्रकारिता

MAHARASHTRA | नीड 24 न्यूज़ · हर खबर, हर शहर | 21 नवम्बर 2026

स्वास्थ्य

टोकावडे ग्रामीण रुग्णालयात डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया; जिल्हा नेत्ररोग अधिकाऱ्यांकडून सुसज्ज शस्त्रक्रियागृहाची पाहणी.



नीड २४ न्यूज महाराष्ट्र
विशेष आरोग्य वृत्त

टोकावडे (ता. मुरबाड, जि. ठाणे)

जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड

दिनांक २१/११/२०२६

विशेष आरोग्य बातमी पत्र

ठाणे, मुरबाड, टोकावडे ::

मुरबाड तालुक्यातील दुर्गम, डोंगराळ आणि ग्रामीण भागातील रुग्णांसाठी आरोग्य क्षेत्रातील एक अत्यंत आनंदाची, दिलासादायक आणि ऐतिहासिक बातमी समोर आली आहे. ग्रामीण रुग्णालय टोकावडे येथे नव्याने उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक आणि सर्वसोयींनी युक्त अशा मोतीबिंदू शस्त्रक्रियागृहाची सविस्तर पाहणी ठाणे जिल्हा नेत्ररोग अधिकारी (District Ophthalmic Officer) डॉ. प्रसन्ना देशमुख यांनी काल (दि. २० नोव्हेंबर) केली. जिल्हा अंधत्व नियंत्रण सोसायटीकडून आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय प्रमाणपत्र मिळताच डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात, म्हणजेच येत्या १ डिसेंबर किंवा ४ डिसेंबरपासून येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया प्रत्यक्षात सुरू केल्या जाणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा यावेळी करण्यात आली.

अत्याधुनिक यंत्रसामग्री, मायक्रोस्कोप आणि स्वच्छतेची सखोल तपासणी:

या पाहणी दौऱ्यादरम्यान डॉ. प्रसन्ना देशमुख यांनी रुग्णालयात नव्याने बसविण्यात आलेल्या जागतिक दर्जाच्या LICA कंपनीच्या अत्याधुनिक मायक्रोस्कोपची (Microscope) बारकाईने तांत्रिक तपासणी केली. यासोबतच नवीन सुसज्ज शस्त्रक्रिया गृह (Operation Theater), स्वतंत्र नेत्र तपासणी विभाग, शस्त्रक्रियेसाठी लागणारी आधुनिक वैद्यकीय उपकरणे, निर्जंतुकीकरण व्यवस्था आणि रुग्णालयातील एकूण स्वच्छतेचा त्यांनी सखोल आढावा घेतला. ग्रामीण स्तरावर उभारण्यात आलेली ही अद्ययावत आणि सुसज्ज तयारी पाहून त्यांनी विशेष समाधान व्यक्त केले. तसेच, शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी व रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी पाळावयाच्या तांत्रिक नियमांबाबत त्यांनी उपस्थित वैद्यकीय पथकाला मोलाचे मार्गदर्शन केले.

खाजगी रुग्णालयांचा खर्च वाचणार; ग्रामीण रुग्णांना गावातच मिळणार मोफत उपचार:

मुरबाड तालुक्यातील टोकावडे आणि आसपासच्या परिसरातील शेकडो गावे व आदिवासी पाड्यांतील नागरिकांना आत्तापर्यंत डोळ्यांच्या तपासणीसाठी आणि मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेसाठी मुरबाड शहर, कल्याण, उल्हासनगर किंवा थेट ठाणे-मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये धाव घ्यावी लागत होती. खाजगी रुग्णालयातील महागडा खर्च आणि प्रवासाचा ताण सामान्य व गरीब कुटुंबांना परवडणारा नव्हता, त्यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक उपचाराअभावी अंधत्वाच्या छायेत जगत होते.

या पार्श्वभूमीवर बोलताना भावना व्यक्त करण्यात आली की, "ग्रामीण भागातील रुग्णांना उपचारासाठी आता लांब जाण्याची किंवा आर्थिक अडचणींचा सामना करण्याची गरज भासणार नाही. त्यांना आपल्याच गावात, कोणत्याही खर्चाशिवाय सुरक्षितपणे दृष्टी बहाल करणे, हाच आमचा मुख्य संकल्प आहे."

सर्व सुविधायुक्त मोतीबिंदू ऑपरेशनचा लाभ घेण्याचे डॉ. मोकाशी यांचे आवाहन:

ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नितीन मोकाशी यांनी या उपक्रमाबद्दल माहिती देताना सांगितले की, रुग्णालयातील नेत्रचिकित्सा विभाग आता पूर्ण क्षमतेने सुरू होत असून, रुग्णांना अत्याधुनिक आणि सर्व सुविधायुक्त डोळ्यांचे मोतीबिंदू ऑपरेशन येथे पूर्णपणे मोफत करून दिले जाणार आहे. रुग्णांची पूर्वतपासणी, शस्त्रक्रिया आणि शस्त्रक्रियेनंतरची काळजी या सर्व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध असतील. तरी टोकावडे परिसरातील सर्व नागरिकांनी आणि गरजू रुग्णांनी या सुवर्णसंधीचा आणि शासकीय सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. मोकाशी यांनी केले आहे.

या महत्त्वपूर्ण पाहणी भेटीप्रसंगी रुग्णालयातील इतर वैद्यकीय अधिकारी, नेत्रचिकित्सा विभागाचे तज्ज्ञ कर्मचारी, परिचारिका आणि इतर आरोग्य कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोफत नेत्र तपासणी व नावनोंदणीसाठी पत्ता:

ग्रामीण रुग्णालय टोकावडे, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे

— Kashinath Desale, ठाणे

मुरबाडमध्ये जुगल जाखोटीया यांच्या गोडाऊनला भीषण आग; अग्निशमन दलाकडून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू

जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले सह तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड. दिनांक २१/११/२०२६ विशेष वृत्त ठाणे मुरबाड (प्रतिनिधी) : मुरबाड शहरातील उद्योजक जुगल जाखोटीया यांच्या गोडाऊनला आज (दि. २०) रात्रीच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात लाकूडसाठा असल्याने

— Kashinath Desale, ठाणे

सोलापुर जिल्ह्यात ऊसाला 3500 दर न देण्यामागचे खरे सुत्रधार.. #शेतकरी #आंदोलन #ऊसदरआंदोलन #सोलापुर #rajushetti

सोलापुर जिल्ह्यात ऊसाला 3500 दर न देण्यामागचे खरे सुत्रधार.. #शेतकरी #आंदोलन #ऊसदरआंदोलन #सोलापुर #rajushetti

— Suhas Tagare

स्थानीय

पुणे-भोर तालुक्यात प्रथमच आढळला दुर्मिळ इंडियन बलून फ्रॉग नावाचा दुर्मिळ बेडूक



पुणे जिल्ह्याच्या भोर तालुक्यातील वेळू गावात शेतकरी शंकर वाडकर यांनी भात काढणी दरम्यान इंडियन बलून फ्रॉग (Uperodon globulosus) नावाचा दुर्मिळ बेडूक शोधला, ही नोंद या भागात प्रथम.

वन्यजीव अभ्यासकांनी सुरक्षितरित्या बेडूक रेस्क्यू करून त्याची ओळख निश्चित केली. या बेडूकाची विशेषता म्हणजे धोका जाणवल्यास शरीर फुगवून बचाव करणे आणि तो जमिनीखाली बिळात राहतो. या प्रजातीची पूर्वी वेळू परिसरात कोणतीही नोंद नसल्यामुळे ही नोंद महत्त्वाची मानली जात आहे. तज्ञांनी या शोधामुळे स्थानिक जैवविविधतेबद्दल जागरूकता वाढेल असे सांगितले.

बेडूकाच्या संरक्षणासाठी स्थानिक प्रशासन व वन्यजीव विभागाने आवश्यक उपाययोजना घेण्याचे आवाहन केले.

— किरण सदाशिव आंबिके

स्थानीय

चिचपल्ली गावात NH-930 रस्त्याचे रुंदीकरण सुरू, अतिक्रमण हटविण्यासाठी ग्रामपंचायतीला नोटीस



चिचपल्ली गावातून जाणाऱ्या NH-930 राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचा प्रश्न आता मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अभियंते व कंत्राटदार यांनी गावात प्रत्यक्ष भेट देऊन रस्त्याची पाहणी केली आणि आवश्यक कार्यवाही करण्याबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. रस्त्याच्या रुंदीकरणासाठी अडथळा ठरणारे काही दुकानांचे अतिक्रमण हटविणे आवश्यक असल्याने चिचपल्ली ग्रामपंचायतीने संबंधित अतिक्रमणधारकांना नोटीस जारी करावी, असे निर्देश राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अभियंत्यांकडून देण्यात आले आहेत. तसेच महावितरण विभागाला आवश्यक सहकार्य करण्याबाबत निवेदन देण्यात येणार असून, रस्त्याच्या लांबी व रुंदीकरणाच्या कामात अडथळा ठरणारी झाडे हटविण्यासाठी वनविभागाच्या अधिकाऱ्यांनाही निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती दिली.

चिचपल्ली गावातील नागरिकांकडून या रुंदीकरणाला कोणताही अडथळा निर्माण होऊ नये आणि संबंधित विभागांनी वेळेत सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सर्व आवश्यक परवानग्या व प्रक्रिया लवकर पूर्ण झाल्यास महामार्गाचे काम लवकर सुरू होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय असून, मोठमोठे खड्डे व अरुंद रस्त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी अपघातांचे प्रमाण वाढत असून अनेक नागरिकांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग विभाग, ग्रामपंचायत, महावितरण आणि वनविभाग यांनी समन्वय साधून रस्त्याच्या रुंदीकरणातील सर्व अडथळे तातडीने दूर करावेत, अशी मागणी चिचपल्ली येथील नागरिकांकडून होत आहे.

— DOCTOR PINTU PAUL

आंभेजोत पाटील यांना मंत्री महेश गोगावले यांची ऑफर



पंढरपूर कार्तिकी एकादशीच्या पूर्वसंध्यापूर्वी मंत्री महेश गोगावले हे पंढरपूर येथे पाहणे करण्यासाठी आले होते त्यावेळेस त्यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना अभिजीत पाटील माढा मतदारसंघाचे आमदार यांना शिवसेनेत आल्यास मंत्री करू अशी ऑफर दिली

— Suhas Tagare

लोणावळ्यात FDA ची मोठी कारवाई; चार प्रसिद्ध हॉटेल्सला दणका



लोणावळ्यातून एक खळबळजनक बातमी: पर्यटकांचे आवडते पर्यटनस्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोणावळ्यातील नामांकित हॉटेल्समध्येच जर नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असेल, तर पर्यटकांनी विश्वास तरी कोणावर ठेवायचा? हॉटेलच्या आकर्षक इमारती, आलिशान सजावट आणि महागड्या मेन्यूच्या आड अन्नसुरक्षेच्या नियमांची पायमल्ली होत असल्याचा धक्कादायक प्रकार अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीत समोर आला आहे. मुदतबाह्य खाद्यपदार्थ, झुरळांचा वावर, अस्वच्छ स्वयंपाकघरे आणि निकृष्ट अन्नसाठा अशा गंभीर त्रुटी आढळल्यानंतर प्रशासनाने लोणावळ्यातील चार नामांकित हॉटेल्सवर थेट कारवाईचा बडगा उगारला आहे. या कारवाईमुळे हॉटेल व्यावसायिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या पुणे विभागाने 'सेफ फूड सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत लोणावळ्यातील प्रमुख हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सची तपासणी केली. या तपासणीदरम्यान अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ तसेच स्वच्छतेसंदर्भातील नियमांचे गंभीर उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर 'दि ऑर्किड', 'रिदम', 'द फर्न' आणि 'बेसिलिका' या चार हॉटेल्सचे अन्न परवाने तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहेत.

प्रशासनाच्या तपासणीत संबंधित हॉटेल्सच्या स्वयंपाकघरांमध्ये धक्कादायक प्रकार समोर आले. मुदतबाह्य खाद्यपदार्थ, खाद्यपदार्थांमध्ये अन्नरंगाचा वापर, झुरळांचा वावर, कच्चे आणि शिजवलेले पदार्थ एकत्र ठेवणे, अस्वच्छ फ्रिज, पाणी साचणे आणि विनाझाकण कचरापेट्या अशा अनेक गंभीर त्रुटी आढळल्या.

'दि ऑर्किड' हॉटेलमध्ये स्वयंपाकघरात तसेच शीतगृहात दुधाची ११ मुदतबाह्य पाकिटे आढळली. याशिवाय कच्चे व शिजवलेले पदार्थ एकत्र ठेवणे, स्वयंपाकघरात पाणी साचणे, अस्वच्छ फ्रिज आणि विनाझाकण कचरापेट्या अशा त्रुटी निदर्शनास आल्या.

'रिदम' हॉटेलमध्ये स्वयंपाकघर आणि बेकरी विभागात झुरळांचा वावर आढळला. तसेच शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थांची स्वतंत्र साठवणूक केली जात नसल्याचे समोर आले. अन्नपदार्थ आणि सॉसच्या बाटल्यांवर आवश्यक लेबल नसणे तसेच पेस्ट कंट्रोलच्या नोंदी उपलब्ध नसणे अशा त्रुटीही आढळल्या.

'बेसिलिका' हॉटेलमध्ये मुदतबाह्य चीज आणि ब्रेड आढळल्याने ते जागेवरच नष्ट करण्यात आले. तसेच कच्च्या चिकनमधून रक्तमिश्रित पाणी गळत असल्याचेही निदर्शनास आले.

मुदतबाह्य खाद्यरंग वापरला जात असल्याचे आढळले. हा रंग नष्ट करण्यात आला. याशिवाय स्वयंपाकघरात मृत आणि जिवंत झुरळेही आढळल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे.

या गंभीर त्रुटींच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने चारही हॉटेल्सचे अन्न परवाने तात्काळ निलंबित केले आहेत. ग्राहकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या कोणत्याही आस्थापनाची गैरदखल केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा अन्न व औषध प्रशासनाचे सहआयुक्त श्रीकांत करकळे यांनी दिल्याचे वृत्तात नमूद आहे.

हॉटेल व्यावसायिकांनी अन्नसुरक्षा, स्वच्छता आणि परवान्याच्या अटींचे काटेकोर पालन करावे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास परवाने निलंबित करण्यासह रद्द करण्याचीही कठोर कारवाई केली जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

लोणावळ्यात दरवर्षी हजारो पर्यटक भेट देतात. येथील हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्स हे पर्यटन व्यवसायाचे महत्त्वाचे घटक आहेत. मात्र, पर्यटकांना दिल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबतच गंभीर प्रश्न निर्माण होत असतील, तर ही बाब निश्चितच चिंताजनक आहे.

केवळ हॉटेल्सच्या बाह्य सजावटीवर आणि आलिशान सुविधांवर भाळून चालणार नाही, तर ग्राहकांना दिले जाणारे अन्न स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार असणे तितकेच महत्त्वाचे आहे. प्रशासनाच्या या कारवाईनंतर इतर हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्समध्येही नियमित तपासणी होणार का? तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अन्य आस्थापनांवरही अशीच कठोर कारवाई होणार का, याकडे आता लोणावळेकरांसह पर्यटकांचे लक्ष लागले आहे.

आलिशान हॉटेलच्या नावाखाली ग्राहकांच्या ताटात निकृष्ट अन्न वाढले जात असेल, तर अशा प्रकारांना आळा बसणे गरजेचे आहे. अखेर ग्राहकांचे आरोग्य महत्त्वाचे की हॉटेलचा झगमगाट? हा प्रश्न या कारवाईमुळे पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

— सतिश हजारे, पुणे

स्थानीय

मुरबाड शहर भाजपची धुरा तरुण तडफदार युवा नेतृत्व अभिजित खडकबाण यांच्या खांऽद्यावर.



जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड.

दिनांक २१/११/२०२६

विशेष वृत्त

मुरबाड :ठाणे

मुरबाड शहरातील भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्याच्या दृष्टीने मुरबाड शहर भाजपच्या अध्यक्षपदी तरुण, तडफदार आणि सक्रिय युवा नेतृत्व अभिजित अशोक खडकबाण यांची निवड करण्यात आली आहे. मुरबाडचे आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा करण्यात आली. या निवडीमुळे शहरातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आगामी मुरबाड नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमदार किसन कथोरे यांच्या जनसंपर्क कार्यालयात भाजप मुरबाड शहर व मुरबाड तालुका पश्चिम मंडळाच्या वतीने संघटनात्मक बैठक आणि पदनियुक्ती समारंभ आयोजित करण्यात आला होता. या बैठकीत पक्ष संघटना अधिक मजबूत करणे आणि पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यावर विशेष भर देण्यात आला. यापूर्वी मुरबाड शहर 'शक्ती केंद्रप्रमुख' म्हणून प्रभावीपणे काम करणाऱ्या अभिजित खडकबाण यांच्यावर पक्षाने आता शहर अध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे.

जनसंपर्क असलेले कार्यकर्ते म्हणून शहरात परिचित आहेत. सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांची कामे मार्गी लावण्यासाठी ते नेहमीच तत्पर असतात. त्यांच्या पत्नी अपर्णाताई खडकबाण यांनीही यापूर्वी मुरबाडे ग्रामपंचायतीच्या सदस्या म्हणून काम पाहिले असून, त्यांच्या कुटुंबाला स्थानिक राजकारण आणि समाजकारणाचा चांगला अनुभव आहे.

या नियुक्ती समारंभास भाजप पश्चिम मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र भावार्थे, पूर्व मंडळाचे अध्यक्ष दीपक पवार, नगराध्यक्ष मोहन गडगे, माजी नगराध्यक्ष मोहन सासे, नगरसेवक मुकेश विशे , नगरसेवक संतोष जाधव, माजी शहराध्यक्ष सुधीरभाई तेलवणे, माजी पंचायत समिती सदस्य अनिल घरत, माजी नगरसेवक रविंद्र देसले, माजी नगरसेवक सुरेश नाना साबळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुरेश बांगर , खरेदी-विक्री संघाचे चेअरमन संतोष पवार, ॲड. सचिन चौधरी, मनोज देसले, नरेश मोरे, अतुल देशमुख, सागर चंभावणे, नगरसेविका मानसीताई मनोज देसले, नगरसेविका रविनाताई विनायक राव, नगरसेविका उर्मिलाताई सुजित ठाकरे, रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष कैलास देसले यांच्यासह भाजपचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

— Kashinath Desale, ठाणे

नौकरी

अपमानजनक वागणूक आणि कमी मजुरीच्या निषेधार्थ आदिवासी शेतमजुरांचे सावर्णे येथे कामबंद आंदोलन शहापूर व मुरबाड तालुक्यातील शेकडो मजूर एकवटले; प्रतिदिन १,००० रुपये मजुरी आणि सन्मानाच्या वागणुकीची मागणी.



जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार

२१/११/२०२६.

शेत मुजरी विशेष वार्ता

मुरबाड ठाणे :प्रतिनिधी / सावर्णे

घाटमाथ्यावरील शेतकऱ्यांकडून मिळणारी अपमानजनक वागणूक आणि वाढत्या महागाईच्या तुलनेत मिळणारा अपुरा मजुरीचा दर, याच्या निषेधार्थ शहापूर व मुरबाड तालुक्यातील विविध आदिवासी गाव-पाड्यांतील शेतमजुरांनी शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी सावर्णे येथे एकत्र येत तीव्र कामबंद आंदोलन पुकारले. सध्या मिळणारी ७०० रुपये मजुरी परवडत नसल्याने प्रतिदिन १,००० रुपये मजुरी मिळावी, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी केली आहे. या आंदोलनामुळे परिसरातील शेतीची कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत.

शहापूर आणि मुरबाड तालुक्यातील विविध आदिवासी पाड्यांवरील शेकडो महिला व पुरुष शेतमजूर सकाळपासूनच सावर्णे येथे मोठ्या संख्येने जमा झाले होते. रोजंदारीवर शेतात राबणाऱ्या आदिवासी मजुरांना घाटमाथ्यावरील काही शेतकऱ्यांकडून योग्य सन्मान दिला जात नाही, तसेच सतत अपमानित केले जाते, असा गंभीर आरोप आंदोलक मजुरांनी यावेळी केला.

वाढत्या महागाईच्या काळात जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडले आहेत. अशा परिस्थितीत दिवसभर कष्ट करूनही केवळ ७०० रुपये मजुरी मिळत असल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. "आम्ही घाम गाळून प्रामाणिकपणे काम करतो, मात्र आम्हाला सन्मानाची वागणूक मिळत नाही आणि मजुरीही अत्यंत कमी दिली जाते. यापुढे हा अपमान आणि आर्थिक पिळवणूक सहन केली जाणार नाही," अशी संतप्त भावना आंदोलक मजुरांनी यावेळी व्यक्त केली.

सन्मानाची वागणूक मिळावी आणि मजुरीचा दर ७०० रुपयांवरून थेट १,००० रुपये करण्यात यावा, या मागण्यांवर मजूर ठाम आहेत. जोपर्यंत या प्रश्नावर सन्मानजनक तोडगा निघत नाही, तोपर्यंत एकाही मजुराने कामावर जाऊ नये, असा ठाम निर्धार यावेळी करण्यात आला.

तालुक्यांतील आदिवासी मजुरांनी पुकारलेल्या या आंदोलनामुळे शेतीकामांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. स्थानिक प्रशासन आणि संबंधितांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन मजुरांच्या मागण्यांवर तातडीने मार्ग काढावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

— Kashinath Desale, ठाणे

अपराध

नागपूरमध्ये 3.75 कोटींची सशस्त्र लूट; पोलिसांनी 5 विशेष पथके गठीत



नागपूर शहरात 19-20 नोव्हेंबर 2026 च्या मध्यरात्री सुमारे 1:30 वाजता जालना येथील व्यापारी आपल्या चारचाकी वाहनाने नागपूरकडे येत असताना 3-4 अज्ञात शस्त्रधारी आरोपींनी गाडी अडवली. शस्त्राचा धाक दाखवून त्यांनी व्यापाऱ्याकडून सुमारे रु. 3,75,00,000/- रोख रक्कम व त्याची गाडी लुटली.

घटनेची माहिती मिळताच नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ पोलीस अधिकारी, गुन्हे शाखा व फॉरेन्सिक टीम घटनास्थळी पोहोचली. पंचनामा करण्यात आला आणि परिसरातील CCTV फुटेज ताब्यात घेण्यात आले, ज्यात लूटची घटना नोंदवली आहे.

पोलिसांनी या प्रकरणासाठी 4-5 विशेष पथके गठीत केली आहेत. आरोपींची ओळख पटवून अटक करण्यासाठी सर्व तांत्रिक व गोपनीय माहितीचा वापर केला जात आहे. रकमेचा स्रोत, मालक, हवालाशी संबंध याबाबतही सखोल तपास सुरू आहे.

नागपूर पोलिसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात येते की, या घटनेबाबत कोणाकडे काही माहिती असल्यास जवळच्या पोलीस स्टेशन किंवा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल.

— DOCTOR PINTU PAUL, नागपुर

स्थानीय

बालमटाकळी गावात टॅन्करने पाणीपुरवठा सुरू



शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी गावात सध्या टॅन्करद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू करण्यात आला आहे. गावातील पाणीटंचाई वाढल्याने प्रशासनाने टँकर सुरू केला असून, त्यामुळे ग्रामस्थांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

या पार्श्वभूमीवर गावात टॅन्करद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. टॅन्करमधून गावातील ठराविक ठिकाणी पाणी सोडले जात असून, ग्रामस्थ तेथून पाणी भरत आहेत.

दरम्यान, अहिल्यानगर जिल्ह्यात पाणीटंचाईने गंभीर रूप धारण केले आहे. शेवगाव तालुक्यातही अनेक गावे आणि वाड्यांना टॅन्करने पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे बालमटाकळीसह तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांमध्ये टॅन्करची संख्या वाढवून नियमित पाणीपुरवठा करावा, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

बालमटाकळी गावात टॅन्करच्या मदतीने पाणीपुरवठा पुन्हा सुरू झाला, ज्यामुळे गावकऱ्यांना तात्पुरती पाण्याची सोय मिळाली.

टॅन्करचा वापर स्थानिक पाणीपुरवठा विभागाने केला असून, तो दररोज निश्चित वेळेत गावातील मुख्य पाण्याच्या टाक्यांमध्ये पाणी पोहोचवतो.

रहिवासी या उपायाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत आहेत आणि कायमस्वरूपी पाणीपुरवठा पुन्हा सुरू होण्याची अपेक्षा व्यक्त करीत आहेत.

— Ramesh Sukhdev Khandagale

सरळगांव येथील धनलक्ष्मी पतसंस्थेच्या चेअरमनपदी डॉ. शशिकांतजी बडेराव यांची निवड.



ठाणे (प्रतिनिधी - काशिनाथ देसले, नीड २४ न्यूज महाराष्ट्र):

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड.

दिनांक २०/११/२०२६. सरळ गाव विशेष वृत्त

मुरबाड ठाणे : : सरळगांव परिसरातील अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या 'धनलक्ष्मी पतसंस्था, सरळगांव'च्या चेअरमनपदी आदरणीय डॉ. शशिकांतजी बडेराव यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल संस्थेचे सभासद, खातेदार आणि संपूर्ण परिसरातून त्यांचे हार्दिक अभिनंदन केले जात आहे.

डॉ. शशिकांतजी बडेराव यांचा सामाजिक व सहकार क्षेत्रातील दांडगा अनुभव लक्षात घेता, त्यांच्या नेतृत्वाखाली धनलक्ष्मी पतसंस्था प्रगतीची नवी शिखरे गाठेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. सर्वसामान्य सभासद आणि खातेदारांच्या हिताचे निर्णय घेत संस्थेचा कारभार अधिक पारदर्शक आणि गतिमान करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे.

या निवडीबद्दल 'नीड २४ न्यूज महाराष्ट्र' चे जिल्हा रिपोर्टर श्री. काशिनाथ देसले यांनी डॉ. शशिकांतजी बडेराव यांची भेट घेऊन किंवा शुभेच्छा संदेशाद्वारे त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

— Kashinath Desale, ठाणे

अपराध

वर्षा तुरकर हत्येत धक्कादायक खुलासा: पत्नीने 13 लाखांची सुपारी दिली, GPS अॅपने पाठलाग



महाराष्ट्रात वर्षा तुरकरच्या हत्येने मोठी खळबळ उडवली. या प्रकरणात पत्नीने पतीच्या महिला मित्राची हत्या करण्यासाठी 13 लाख रुपयांची सुपारी दिल्याचा संशय व्यक्त झाला आहे.

पोलिसांच्या तपासानुसार, GPS अॅपच्या माध्यमातून त्या महिला मित्राचा पाठलाग करून हत्येचा कट रचला गेला. या कटात पत्नी आणि इतर चार व्यक्तींचा सहभाग असल्याचे नोंदवले गेले.

संबंधित चार आरोपींना, ज्यात पत्नीही समाविष्ट आहे, अटक करण्यात आली आहे. प्रशासनाकडे हत्येच्या संपूर्ण कटाची निष्पक्ष चौकशी, आर्थिक व्यवहाराची तपासणी आणि डिजिटल पुराव्यांची तपासणी करण्याची मागणी केली जात आहे.

या घटनेमुळे वैयक्तिक वाद, संशय आणि कौटुंबिक संघर्षातून गुन्हेगारी कृत्ये घडण्याचा प्रश्न पुन्हा एकदा उभा राहिला आहे. पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी खटला जलदगतीने चालवावा, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

— DOCTOR PINTU PAUL

सातासमुद्रापार खडवलीच्या लेकीचा डंका! जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत प्रतीभा लोणे हिला कांस्यपदक; जगात पटकावला आठवा क्रमांक



नीड २४न्यूज महाराष्ट्र

जिल्हा रिपोर्टर काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका रिपोर्टर किशोर पवार मुरबाड

दिनांक २०/११/२०२६.

खेळ विशेष वृत्त =

कल्याण / मुरबाड :

जिद्द, चिकाटी आणि अफाट मेहनतीच्या जोरावर ग्रामीण भागातील खेळाडूही जागतिक पातळीवर आपली मोहोर उमटवू शकतात, हे खडवलीच्या सुकन्या प्रतीभा अरुण लोणे हिने पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे. तुर्की येथील इस्तंबूल शहरात पार पडलेल्या प्रतिष्ठेच्या ‘वर्ल्ड ओपन इक्विप्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप’ (World Open Equipped Powerlifting Championship) स्पर्धेत प्रतीभाने भारताचे प्रतिनिधित्व करत कांस्यपदक पटकावले आहे. तिच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे भारताचा तिरंगा सातासमुद्रापार अभिमानाने फडकला असून कल्याण, मुरबाडसह संपूर्ण ठाणे जिल्ह्याची मान उंचावली आहे.

असा रंगला थरारक सामना आणि कामगिरीचा आलेख:

या जागतिक स्पर्धेत जगभरातील अनेक बलाढ्य आणि दिग्गज खेळाडूंनी सहभाग घेतला होता. महिलांच्या खुल्या ८४ किलो वजनी गटात उतरलेल्या प्रतीभाने सुरुवातीपासूनच आपल्या दमदार खेळाचे प्रदर्शन घडवले.

• स्क्वॉट (Squat): या प्रकारात तिने अविश्वसनीय ताकदीचे प्रदर्शन करत तब्बल २४२.५ किलो वजन यशस्वीरित्या उचलले आणि तिसऱ्या क्रमांकासह कांस्यपदकावर आपले नाव कोरले.

• बेंच प्रेस (Bench Press): दुसऱ्या टप्प्यात तिने १०० किलो वजन उचलत आपली आघाडी कायम ठेवली.

• डेडलिफ्ट (Deadlift): अंतिम टप्प्यात तिने १९० किलो वजनाची यशस्वी उचल केली.

अशाप्रकारे तिन्ही प्रकारांत मिळून तिने एकूण ५३२.५ किलो वजनाची नोंद करत जागतिक क्रमवारीत आपल्या वजनी गटात आठवा क्रमांक पटकावण्याची किमया साधली आहे.

कल्याण-मुरबाड परिसरात आनंदाचे वातावरण:

खडवलीसारख्या भागातून कोणतीही मोठी पार्श्वभूमी नसताना केवळ आपल्या जिद्दीच्या जोरावर प्रतीभाने हा प्रवास पूर्ण केला आहे. तिचे वडील अरुण लोणे आणि कुटुंबीयांनी दिलेली खंबीर साथ, तसेच प्रशिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना व्यक्त होत आहे. प्रतीभाच्या या नेत्रदीपक यशानंतर कल्याण, मुरबाड तालुका आणि संपूर्ण ठाणे जिल्ह्यातून तिच्यावर अभिनंदनाचा व कौतुकाचा वर्षाव होत असून, आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये ती सुवर्णपदक जिंकेल, असा विश्वास क्रीडाप्रेमींकडून व्यक्त केला जात आहे.

— Kashinath Desale, ठाणे

श्री संत मट्टू महाराज संस्थान, कोठा (वेणी) येथे २४ ते २७ नोव्हेंबरदरम्यान भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन भव्य श्री संत मेळावा, काला व वारकरी दिंडी स्पर्धेसह विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी



श्री संत मट्टू महाराज संस्थान, कोठा (वेणी) येथे २४ ते २७ नोव्हेंबरदरम्यान भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन भव्य श्री संत मेळावा, काला व वारकरी दिंडी स्पर्धेसह विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :- सुशील हटवार

कोठा (वेणी), ता. कळंब, जि. यवतमाळ :

श्री संत मट्टू महाराज संस्थान, कोठा (वेणी), ता. कळंब, जि. यवतमाळ यांच्या वतीने श्री संत मट्टू मालक महाराज यांच्या जयंतीनिमित्त मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर ते शुक्रवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये भव्य श्री संत मेळावा, काला, वारकरी दिंडी स्पर्धा, कीर्तन, पालखी मिरवणूक, दहीहंडी, महाप्रसाद तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

या चार दिवसीय महोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरा, वारकरी संप्रदायाची भक्तीभावना, संत विचारांचा प्रसार आणि सामाजिक एकोपा जपण्याचा संकल्प आयोजकांनी केला आहे. या सोहळ्यास परिसरातील तसेच जिल्हाभरातील भाविक, वारकरी, संत-महंत, भजनी मंडळे आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थान व आयोजक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

चार दिवसांचे कार्यक्रम पुढीलप्रमाणे :

१) मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२६ – भव्य ऑर्केस्ट्रा

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत भव्य ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील नामवंत भालदार कलाकार ह.भ.प. श्री संतोष महाराज भालेराव (लाठी सेलबाजार) तसेच ह.भ.प. श्री हरिभाऊ महाराज शिंदे (वाशीम) यांच्या मधुर वाणीतून संगीत आणि नादमय भक्तिरसाचा आनंद रसिकांना घेता येणार आहे.

२) बुधवार, दिनांक २५ नोव्हेंबर २०२६ – भव्य संत मेळावा, कीर्तन व वारकरी दिंडी स्पर्धा

महोत्सवातील प्रमुख आकर्षण असलेल्या संत मेळाव्यासाठी विविध संत-महंतांची उपस्थिती लाभणार आहे. यामध्ये श्री दिवाकर महाराज (इचोरा फाटा), श्री प्रभाकरराव वानखेडे (हुसनापूर), सोनामाता (धनोडी), श्री संत बालयोगी अनंत महाराज (श्रीरामपूर, मु. कोठुली, ता. राळेगाव), संत बालयोगी ऋषिकेश महाराज (वाघोडा, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती) आदींची उपस्थिती राहणार आहे.

या दिवशी दुपारी १२ वाजता कीर्तनाचा कार्यक्रम होणार असून, दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत वारकरी दिंडी व पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ५.३० वाजता दहीहंडीचा कार्यक्रम होईल. त्यानंतर लगेचच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

तसेच ह.भ.प. श्री लक्ष्मणराव तराळ महाराज (कापरा) यांच्या काल्याच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले असून, कोठा येथील वारकरी भजनी मंडळ व गुरुदेव सेवा मंडळ यांची साथ लाभणार आहे.

वारकरी दिंडी स्पर्धेचे विशेष आकर्षण :

पान व १,००१ रुपये देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. दिंडी स्पर्धकांनी बुधवार, दिनांक २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ठीक ११ वाजता उपस्थित राहावे. दिंडीची नोंदणी सकाळी ९ वाजेपर्यंत संस्थानात करणे आवश्यक आहे. दिंडीमध्ये किमान १० ते १५ व्यक्ती असणे आवश्यक आहे, असे आयोजकांनी कळविले आहे.

३) गुरुवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२६ – बाल कीर्तन सोहळा

महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत बाल कीर्तनकार ह.भ.प. देवांनंद महाराज सोनवणे, यवतमाळ यांचा कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यांच्या कीर्तनातून भक्ती, संस्कार, संत विचार आणि वारकरी परंपरेचे महत्त्व भाविकांना अनुभवता येणार आहे.

४) शुक्रवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ – सांस्कृतिक नाट्यप्रयोग

महोत्सवाच्या समारोपाच्या दिवशी बहुउद्देशीय ज्ञानदीप कला मंडळ, कळंब प्रस्तुत 'लावणी प्रधान दोन अंकी नाटक – शापित गर्भ' हा नाट्यप्रयोग सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत सादर करण्यात येणार आहे.

संतविचार, भक्ती आणि सामाजिक एकोप्याचा संदेश

श्री संत मट्टू मालक महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित हा यात्रा महोत्सव केवळ धार्मिक सोहळा नसून वारकरी संप्रदायाची परंपरा जपणारा, संतांच्या विचारांचा प्रसार करणारा आणि समाजातील बंधुभाव अधिक दृढ करणारा उपक्रम आहे. या निमित्ताने विविध गावांतील दिंड्या, पालख्या, भजनी मंडळे आणि वारकरी एकत्र येऊन भक्तिमय वातावरण निर्माण करणार आहेत.

या संपूर्ण कार्यक्रमाचा लाभ परिसरातील सर्व भाविक भक्तांनी घ्यावा. तसेच पालखी व दिंडी प्रमुखांनी आपल्या दिंडीसह वेळेत उपस्थित राहून स्पर्धेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

आयोजक :

श्री संत मट्टू मालक संस्थान, कोठा (वेणी)

गावकरी भक्त पंच कमिटी, कोठा (वेणी)

वारकरी भजनी मंडळ, कोठा (वेणी)

संपर्क : श्री संत मट्टू मालक संस्थान, कोठा (वेणी).

टीप : सर्व भाविक भक्तांनी महाप्रसादाचा व यात्रा महोत्सवातील सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

— जनसामान्यांचा आवाज, युवा संघर्ष न्यूज —

— SUSHIL RAMESH HATWAR

स्थानीय

भोर-महाड महामार्गावर लोणच्याची अस्वच्छ वाहतूक: लाल द्रव रस्त्यावर रक्तासारखा



भोर-महाड राष्ट्रीय महामार्गावर एक टेम्पो लोणच्याची वाहतूक करत होता. गोण्यांमध्ये अस्वच्छ पद्धतीने भरलेले लोणचे रस्त्यावर लाल रंगाचे द्रव गळवत होते, ज्यामुळे रस्ता रक्तासारखा दिसत होता.

या घटनेमुळे महामार्गावरून जाणाऱ्या वाहनचालक आणि पादचाऱ्यांमध्ये मोठा संभ्रम आणि भीती निर्माण झाली. नागरिकांनी तात्काळ स्थानिकांना माहिती दिली, ज्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण पसरले.

अन्नपदार्थांची वाहतूक करताना स्वच्छतेचे नियम पाळणे अनिवार्य आहे, परंतु या टेम्पोने त्या नियमांचे उल्लंघन केले. नागरिकांनी अन्न व औषध प्रशासन (FDA) आणि स्थानिक प्रशासनावर दुर्लक्ष केल्याचा आरोप केला.

या बेकायदेशीर आणि आरोग्यास घातक वाहतुकीवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी वाढली आहे. संबंधित टेम्पो चालक आणि लोणच्याचे उत्पादक यांच्यावर FDA कडून कठोर कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे.

— किरण सदाशिव आंबिके

भोर तालुक्यात कार्तिक शुक्ल नवमीला आवळा नवमीची उत्साही पूजा



भोर तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात कार्तिक शुक्ल नवमीच्या दिवशी आवळा वृक्षाची पूजासह आवळा नवमी साजरी करण्यात आली.

पुण्याच्या भोर तालुक्यातील भक्तांनी आवळा वृक्षावर दिवे लावले, गोड नैवेद्य अर्पण केले, प्रदक्षिणा केली व वृक्षाच्या छायेत अन्नदान केले.

देव-देवतांच्या निवासासाठी आवळा वृक्षाला मानले जाते व या दिवशी सर्व देवी-देवता आवळा वृक्षावर येऊन निवास करतात, तसेच आवळा वृक्षातून अमृत बिंदु वर्षाव होतो अशी मान्यता आहे.

आवळा पूजेचे महत्त्व आरोग्य, सुख, समृद्धी व धार्मिक श्रद्धेशी जोडलेले असून मुलांच्या कल्याण व सौभाग्यासाठी ही नवमी विशेष मानली जाते.

— किरण सदाशिव आंबिके

अपराध

मेहकर पोलिसांची मोठी कारवाई; २० किलो गांजा जप्त



मेहकर पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे धडक कारवाई करत समृद्धी महामार्गाजवळ जानेफळकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका पांढऱ्या रंगाच्या इर्टिगा वाहनातून तब्बल २० किलो गांजा जप्त केला. या प्रकरणी सहा पुरुष आणि एका महिलेला ताब्यात घेण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. दोन ट्रॉली बॅगमधून हा गांजा आढळून आल्याचे समजते.

— Suhas Tagare

सोलापूर : अवैध मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतुकीविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई; सात महिन्यांत १०.५८ कोटींचा मुद्देमाल जप्त!



सोलापूर जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतुकीविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक मोहीम राबवली आहे. गेल्या सात महिन्यांत विभागाने तब्बल १० कोटी ५८ लाख ३६ हजार ३५९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या कारवाईत १,१४१ गुन्हे दाखल, २,०३६ जणांवर कारवाई, १९५ वाहने जप्त करण्यात आली असून, गोवा बनावटीच्या मद्याची वाहतूक करणाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्यात आली आहे.

१ एप्रिल ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध मद्यविक्री आणि वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबवून मोठ्या प्रमाणात कारवाई केली.

— YALLAPPA RAGATE (PATIL)

समाजाचा वधू-वर परिचय मेळावा; विवाह इच्छुकांसाठी विशेष आयोजन



चर्मकार समाज वधू-वर परिचय मेळावा रविवारी सोलापुरात; समाजातील विवाह इच्छुकांसाठी महत्त्वाची संधी

सोलापूर : संत शिरोमणी रविदास विकास संस्था, महाराष्ट्र यांच्या वतीने तसेच संस्थेच्या संचलित रेशीम बंध वधू-वर सूचक मंडळाच्या माध्यमातून चर्मकार समाजातील विवाह इच्छुक युवक-युवतींसाठी चर्मकार समाज वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

हा मेळावा रविवार, दिनांक २९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आला असून, लक्ष्मीतर गार्डन, पधावतीनगर, बाळे, सोलापूर, पुणे हायवे येथे हा कार्यक्रम होणार आहे.

पुण्यातील संत शिरोमणी रविदास विकास संस्था, महाराष्ट्र ही संस्था समाजाच्या विकासासाठी विविध सामाजिक उपक्रम राबवत असून, विवाह इच्छुक युवक-युवतींना योग्य जीवनसाथी निवडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

प्रमुख उपस्थिती

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून खालील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

श्री. भारत वाघमारे – सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी, सोलापूर

श्री. राजेश्वर जेऊरकर – मुख्य निमंत्रक, चर्मकार समाज विकास मंडळ, सोलापूर

श्री. तानाजी गवळी – पोलीस उपनिरीक्षक, सोलापूर

सौ. श्रीदेवी जॉन फुलारे – नगरसेविका, सोलापूर महानगरपालिका

सौ. संगीता शंकर जाधव – नगरसेविका, सोलापूर महानगरपालिका

आयोजकांकडून समाजबांधवांना आवाहन

या मेळाव्याचे आयोजन श्री. सुखदेव नारायण सूर्यवंशी (संस्थापक व अध्यक्ष) यांच्या पुढाकाराने करण्यात आले आहे. समाजातील विवाह इच्छुक युवक-युवती व त्यांच्या पालकांनी या मेळाव्यात सहभागी होऊन आपल्या मुला-मुलींच्या विवाहासाठी योग्य स्थळांची माहिती मिळवावी, तसेच समाजातील एकमेकांशी परिचय वाढवावा, असे आयोजकांकडून आवाहन करण्यात आले आहे.

मेळाव्यासाठी नाममात्र प्रवेश शुल्क ₹५०० ठेवण्यात आले आहे.

संपर्कासाठी

मेळाव्याबाबत अधिक माहिती, नाव नोंदणी व इतर माहितीसाठी आयोजकांनी दिलेल्या संपर्क क्रमांकांवर संपर्क साधावा.

सामाजिक बांधिलकी व समाजसेवा हेच आमचे ध्येय!

— YALLAPPA RAGATE (PATIL)

अपराध

चंद्रपूरमध्ये पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांचा गुन्हेगारांविरुद्ध सर्जिकल स्ट्राईक, ५४ आरोपींवर मोक्का कारवाई



चंद्रपूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांच्या नेतृत्वाखाली आक्रमक कारवाई करण्यात आली.

आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

त्याचबरोबर ९८ सराईत गुन्हेगारांना जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले, ज्यामुळे गुन्हेगारी जगताला मोठा धक्का बसला.

या कठोर कारवाईमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना बळकट होण्याची अपेक्षा आहे आणि गुन्हेगारांवर पोलिसांचा धाक निर्माण झाला आहे.

पोलीस प्रशासनाचा स्पष्ट संदेश – चंद्रपूर जिल्ह्यात गुंडगिरी, दहशत आणि गुन्हेगारीला कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही.

— DOCTOR PINTU PAUL

राजनीति

ठाणे जिल्ह्याला दुष्काळाच्या यादीतून वगळले; मुरबाड, शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र निराशा.



ठाणे जिल्ह्याला दुष्काळाच्या यादीतून वगळले; मुरबाड, शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र निराशा

शेजारील पालघर जिल्ह्यातील तालुक्यांचा समावेश, मात्र ठाणे जिल्ह्यावर अन्याय झाल्याची बळीराजाची भावना

जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड.

विशेष दुष्काळ मागणी वार्ता पत्र

मुरबाड / ठाणे :दिनांक २०/११/२०२६.

राज्य शासनाने यापूर्वी जाहीर केलेल्या ३०४ दुष्काळी तालुक्यांव्यतिरिक्त राज्यातील आणखी ६ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केले आहेत. त्यामुळे राज्यातील एकूण दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३१० वर पोहोचली आहे. मात्र, या सुधारित यादीतूनही ठाणे जिल्ह्याला पूर्णपणे वगळण्यात आल्याने जिल्ह्यातील कृषीप्रधान असलेल्या मुरबाड आणि शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र निराशा पसरली आहे.

शासनाच्या नव्या निर्णयानुसार नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी, रत्नागिरीतील चिपळूण, कोल्हापूरमधील हातकणंगले व गडहिंग्लज तसेच ठाणे जिल्ह्याला लागून असलेल्या पालघर जिल्ह्यातील वाडा आणि विक्रमगड या तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्यात आला आहे. शेजारील पालघर जिल्ह्यातील वाडा आणि विक्रमगड या तालुक्यांना दुष्काळी सवलतींचा लाभ मिळणार असताना, सारखीच भौगोलिक परिस्थिती आणि शेतीचे नुकसान सोसणाऱ्या मुरबाड व शहापूर तालुक्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याची भावना स्थानिक शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

तालुक्यांमध्ये शासनाकडून विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. यामध्ये जमीन महसुलात सूट, पीककर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, ७.५ हॉर्सपावरपेक्षा जास्त क्षमतेच्या कृषी पंपांच्या चालू वीजबिलात सवलत, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी आणि रोहयो (MGNREGA) अंतर्गत कामांच्या निकषांत शिथिलता अशा महत्त्वाच्या उपाययोजनांचा समावेश आहे.

ठाणे जिल्ह्याचा समावेश नसल्याने मुरबाड आणि शहापूर तालुक्यातील हजारो शेतकरी आणि विद्यार्थी या सर्व शासकीय सवलतींपासून वंचित राहणार आहेत. आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना या निर्णयामुळे मोठा धक्का बसला आहे. राज्य शासनाने या निर्णयाचा फेरविचार करून मुरबाड आणि शहापूर तालुक्यांचा तातडीने दुष्काळग्रस्त यादीत समावेश करावा, अशी जोरदार मागणी स्थानिक शेतकरी व शेतकरी संघटनांकडून केली जात आहे.

माननीय आमदार किसन जी कथोरे साहेब यांनी मुरबाड तालुक्याच्या शेतकऱ्यांच्या वतीने दुष्काळ जाहीर करावा या साठी मुख्य मंत्री यांच्या कडे सविस्तर निवेदन दिलेले असताना देखील दुष्काळ जाहीर करण्यात आलेला नाही. ही खेदाची बाब

आहे, शासनाने आता तरी शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. आमदार

किसनजी कथोरे साहेबांची मागणी रास्त आहे व ती मागणी मान्य करावी.

— Kashinath Desale, ठाणे

अपराध

नाशिकच्या TCS धर्मांतर व लैंगिक छळ प्रकरणात इम्तियाज जलील यांना ५०,००० रुपयांच्या जामिनावर रिलीझ



नाशिक शहरातील TCS धर्मांतर व लैंगिक छळ प्रकरणात महाराष्ट्रातील मुस्लिम इंटेग्रेटेड मोशन (MIM) नेते इम्तियाज जलील यांना ५०,००० रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर झाली, असे स्थानिक न्यायालयाने ठरवले.

जामीन मिळाल्यानंतर जलील यांनी पहिली प्रतिक्रिया दिली, परंतु त्यांची टिप्पणी सार्वजनिकपणे उपलब्ध नाही.

या प्रकरणात त्यांच्यावर निदा खानला आश्रय दिल्याचा आरोपही लावला गेला आहे.

— Sayeed Shareq Sayeed Khaleq, नासिक

जीवनशैली

जनभागीदारीतून जलक्रांती, जलयुक्त शिवार 3.0 द्वारे जलसमृद्ध महाराष्ट्राची निर्मिती!



जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड.

नीड २४न्यूज महाराष्ट्र

मुंबई:ठाणे, दि २० केंद्रीय मंत्री सी आर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली (ऑनलाइन) व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज मुंबई येथे 'जलसंचय जनभागीदारी : कॅच द रेन 2026 (सीटीआर)'च्या प्रगतीसंदर्भात आढावा बैठक पार पडली.

पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवून भूजल पातळी वाढविणे, जुन्या जलसंधारण संरचनांचे पुनरुज्जीवन करणे आणि नव्या संरचनांची निर्मिती करणे, यासाठी राज्य शासनाने व्यापक कृती आराखडा तयार केला आहे. केंद्र शासनाच्या 'जलसंचय : जनभागीदारी अभियानांतर्गत' राज्यात मे 2027 पर्यंत 34,83,940 भूजल पुनर्भरण संरचनांची निर्मिती पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने आणि निश्चित उद्दिष्टानुसार काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, एल निनोच्या प्रभावामुळे महाराष्ट्रासमोर दुष्काळाचे मोठे संकट निर्माण झाले आहे. राज्यातील जवळपास 90% भाग दुष्काळाच्या झळा सोसत असून, पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आगामी काळात पिण्याच्या पाण्याची मागणी वाढण्याची शक्यता आहे. या संकटाचे संधीत रूपांतर करण्याच्या दृष्टीने जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्यात येत आहे. जुन्या जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन, तलावांची दुरुस्ती, शेततळी आणि पुनर्भरण खड्ड्यांची निर्मिती यावर विशेष भर देण्यात येत आहे.

जलयुक्त शिवार 3.0 ची 18,000 गावांत अंमलबजावणी

राज्य शासनाची महत्त्वाकांक्षी जलयुक्त शिवार योजना तिसऱ्या टप्प्यात राबविण्यात येणार असून, त्यासाठी 18,000 गावांची निवड करण्यात आली आहे. जलयुक्त शिवार 3.0, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, मनरेगा तसेच इतर योजनांमधील निधी आणि कामांचे एकत्रीकरण करून जलसंधारणाची कामे अधिक प्रभावीपणे राबविण्यात येतील. या कामांचे शास्त्रीय पद्धतीने नियोजन, मॅपिंग आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जलसंधारणाच्या कामांसाठी ग्रामविकास, वन, सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, कृषी आणि पाणीपुरवठा विभागांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली सर्व विभागांनी एकत्रितपणे काम करावे. वन विभागामार्फत वनबंधारे आणि वनतळ्यांची निर्मिती, तसेच सार्वजनिक बांधकाम व नगरविकास विभागामार्फत खासगी घरे तसेच शासकीय इमारतींवर छतावरील पावसाचे पाणी साठविण्याच्या (रूफटॉप रेनवॉटर हार्वेस्टिंग) उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. याशिवाय, पावसाळ्यात वाहणाऱ्या आणि उर्वरित काळात कोरड्या राहणाऱ्या 50 किलोमीटर किंवा त्यापेक्षा अधिक लांबीच्या नद्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे कामही सुरू करण्यात आले आहे.

जलसंधारणासाठी केंद्र सरकारकडे विशेष निधीची मागणी

राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विद्यमान जलसंधारण संरचनांची दुरुस्ती, तलावांचे पुनरुज्जीवन, शेततळी आणि पुनर्भरण खड्ड्यांची निर्मिती यासाठी केंद्र सरकारकडे विशेष आर्थिक मदतीची मागणी करण्यात आली आहे. प्रचलित निकषांच्या पलीकडे जाऊन केंद्र सरकारने राज्याला ही मदत करावी, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

जल जीवन मिशनअंतर्गत निधी खर्चाचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. डिसेंबरपर्यंत निधी विनियोगाचे प्रमाण 50% पर्यंत नेण्याच्या दृष्टीने आवश्यक सूचना देण्यात येतील. तसेच योजनेची शाश्वतता राखण्यासाठी पाण्याचा खात्रीशीर स्रोत आणि वीजबिल भरणा या दोन महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

जल जीवन मिशनची कामे पूर्ण करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने एकत्रितपणे राज्यनिहाय अडचणींचा अभ्यास करून उपाययोजना निश्चित कराव्यात. प्रत्येक राज्याच्या अडचणी वेगळ्या असल्याने एकच उपाय सर्व राज्यांना लागू होऊ शकत नाही यासाठी केंद्र व राज्य अधिकाऱ्यांची विशेष बैठक घेऊन निधी, संसाधने आणि कामांचे नियोजन करण्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

जलसंधारणाच्या कामांमध्ये लोकप्रतिनिधींच्या स्थानिक विकास निधीचाही उपयोग वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. राज्यस्तरावर जलसंधारण पुरस्कार आणि स्पर्धांचे आयोजन करून गावांमध्ये सकारात्मक स्पर्धा निर्माण करणे आवश्यक आहे. यापूर्वी जलयुक्त शिवार आणि वॉटर कपसारख्या उपक्रमांमुळे गावागावांत मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग मिळाला आहे. याच धर्तीवर जलसंचय अभियानातही लोकसहभाग वाढविण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

जलसंचय अभियानांतर्गत निश्चित करण्यात आलेली उद्दिष्टे मे 2027 पर्यंत पूर्ण करण्याची राज्य शासनाची जबाबदारी असून, या कामांचा मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव आणि संबंधित विभागांच्या स्तरावर नियमित आढावा घेण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. राजभूषण चौधरी (ऑनलाइन) व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

— Kashinath Desale, ठाणे

स्थानीय

भोंगवलीत शासनाचा बंधारा बुजवल्याचा आरोप; पुणे ट्रान्समिशन कंपनीवर कारवाई होणार का? बाळासाहेब शेडगे यांची कृषी विभागाकडे तक्रार;



कृषी अधिकारी शरद धर्माधिकारी यांच्याकडून प्रत्यक्ष स्थळ पाहणी, बंधारा आढळला नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष

भोंगवली | भोर : पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील भोंगवली येथे गट क्रमांक १९३ आणि १९९ मधील शासनाने बांधलेला बंधारा पुणे ट्रान्समिशन कंपनीने कोणतीही आवश्यक परवानगी न घेता बुजवल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे तसेच वन्यजीवांचे मोठे नुकसान झाल्याची तक्रार करण्यात आली असून, संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

विभागाकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार आज, दि. १७ नोव्हेंबर रोजी कृषी अधिकारी शरद धर्माधिकारी यांनी संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन स्थळ पाहणी केली. या पाहणीदरम्यान त्यांनाही संबंधित ठिकाणी बंधारा आढळून आला नसल्याचे सांगण्यात आले.

शासनाच्या माध्यमातून उभारण्यात आलेला बंधारा नेमका कोणी आणि कोणत्या परवानगीच्या आधारे बुजवला? यासाठी संबंधित विभागाची मंजुरी घेण्यात आली होती का? तसेच बंधारा बुजवल्यामुळे परिसरातील शेती, पाणीसाठा आणि वन्यजीवांवर झालेल्या परिणामांची जबाबदारी कोण घेणार? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

बंधाऱ्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना पाण्याचा आधार मिळत होता. मात्र, तो बुजवण्यात आल्यामुळे आजूबाजूच्या शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता असून, वन्यजीवांच्या पाण्याच्या उपलब्धतेवरही परिणाम झाल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, या परिसरातील जमीन, उत्खनन आणि औद्योगिक कामांबाबत यापूर्वीही अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत. आता शासनाच्या बंधाऱ्याचा विषय समोर आल्याने प्रशासनाने या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

शासनाचा बंधारा बुजवणाऱ्यांना अभय कोणाचे?

सामान्य नागरिकांनी शासनाच्या मालमत्तेचे नुकसान केले तर त्यांच्यावर तातडीने कारवाई होते; मग शासनानेच बांधलेला बंधारा बुजवण्याचा प्रकार घडला असेल, तर संबंधितांवर कारवाई करण्यास प्रशासनाला अडचण काय? असा सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत.

आता कृषी विभागाच्या स्थळ पाहणीनंतर पुढे कोणती कार्यवाही होते, महसूल विभाग आणि संबंधित यंत्रणा या प्रकरणाची चौकशी करतात का आणि शासनाच्या बंधाऱ्याचे नुकसान करणाऱ्यांवर प्रत्यक्ष कारवाई होते का, याकडे भोंगवली ग्रामस्थांसह परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

— किरण सदाशिव आंबिके

स्थानीय

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरातील श्री क्षेत्रात पाहणी दौरा केला



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरातील श्री क्षेत्रात पाहणी दौरा केला.

या दिवशी त्यांनी स्थानिक पायाभूत सुविधा आणि धार्मिक स्थळांची स्थिती तपासली.

पंढरपूरातील या पाहणी दौऱ्याने राज्याच्या विकास योजनांच्या अंमलबजावणीबद्दल अधिक स्पष्टता मिळाली.

— Suhas Tagare